# अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर.

## <u>जाहिर निविदा</u>

( उत्सुकतेची अभिव्यक्ती )

(EXPRESSION OF INTEREST )

**<u>अहमदनगर महानगरपालिका , महाराष्ट्र राज्य ,</u>**

**<u>मनोरंजन उद्यान</u>** . या प्रकाराचा आधुनिक कलात्मक पध्दतीने सार्वजनिक – खाजगी भागीदारी तत्वावर ( पी.पी.पी ) किंवा अन्य पध्दतीने विकास करणेसाठी उत्सुकतेची अभिव्यक्ती ( इ.ओ.आय) या स्वरुपात जाहीर प्रस्ताव मागवित आहे. .

## <u>संक्षेपात प्रकल्प</u>

१) या प्रकल्पाचा मुख्य उद्देश अहमदनगर शहर व परिसरातील नागरीक तसेच शिर्डी व शनि शिंगणापुर या तिर्थस्थळांना दर्शनासाठी येणा-या भाविकांना **<u>मनोरंजन उद्यान</u>** ही सेवा पुरविणे हा आहे.

२) **<u>प्रकल्पाची जागा व परिसर –</u>** अहमदनगर शहराच्या उत्तर हद्दीपासुन सुमारे ७ कि. मी. अंतरावर अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकिचा तलाव आहे, या तलावाचे प्रचलित नाव पिंपळगाव माळवी तलाव असे असुन सदर तलावाचे क्षेत्र सुमारे २५७ हेक्टर आहे. सदर तलावाच्या पश्चिमेस भरावाच्या भिंतीसह व रस्त्यासह एकुण ७८ हेक्टर क्षेत्र खुल्या स्वरुपात उपलब्ध आहे. मौजे पिंपळगाव माळवी व तलावाचा परिसर निसर्गरम्य असुन आजुबाजुस अवतार मेहेर बाबांच्या मेहराझाद या अध्यात्मिक केंद्रासह इतर अनेक महत्वाची धार्मिक तिर्थस्थाने आहेत, या तलावा पासुन उत्तरेस २२ कि.मी. अंतरावर तिर्थक्षेत्र शनिशिंगणापुर हे तिर्थक्षेत्र विद्यमान असुन श्री. साईबाबा यांची पवित्र समाधी असलेले जागतिक किर्तीचे तिर्थस्थळ देखील या तलावा पासुन ६० कि.मी. अंतरावर आहे. अहमदनगर शहराच्या परिसरात अद्याप एकही पर्यटनस्थळ विकसित झालेले नाही. या प्रस्तावातील तलावाचे व मोकळ्या जागेचे उपलब्ध असलेले मोठे क्षेत्र , निसर्गरम्य परिसर , व महत्वाच्या तिर्थस्थळा पासुन कमी असलेले अंतर इत्यादी बाबी विचारात घेता हा तलाव **<u>मनोरंजन उद्यान</u>** म्हणुन विकसित केल्यास त्यास मोठा नावलौकीक मिळेल व या प्रकल्पा पासुन विकासकास व महानगरपालिकेस मोठे उत्पन्न मिळेल अशी अपेक्षा आहे.

३) वर नमुद बाबी विचारात घेऊन अहमदनगर महानगरपालिकेच्या महासभेने सदर पिंपळगाव तलाव व परिसर पर्यटनस्थळ म्हणुन विकसित करणेबाबत निर्णय घेतलेला असुन तशा आशयाचा ठराव क्र. ४ दि. २७/१२/२००७ अन्वये पारित केलेला आहे.

४) हा प्रकल्प बी. ओ. ओ. टी.( BUILD CONTINUE TO OWN PERATE AND TRANSFER BASIS ) या किंवा अन्य सुयोग्य पध्दतीने विकसित करण्याचा अहमदनगर महानगरपालिकेचा मानस आहे. संबधितांनी आपले विकास प्रस्ताव सादर करताना खालील मुद्यांचा प्रकल्प अहवालात समावेश करणे आवश्यक आहे.

अ) अशा प्रकल्पावरील कामाचा पुर्वानुभव

ब) विकास प्रस्तावाची तपशिलवार माहिती ( आवश्यक त्या नकाशासह )

क) प्रकल्पाचे आर्थिक नियोजन ( या नियोजनासाठी येणारा प्रत्यक्षात खर्च व झालेला खर्च कशा पध्दतीने वसुल करणार या बाबतची तपशिलवार माहिती )

ड) या प्रकल्पासाठी अहमदनगर महानगरपालिका तलावाच्या क्षेत्रासहीत एकुण ३३५ हेक्टर इतकी जमिन उपलब्ध करुन देणार आहे. त्यामुळे या प्रकल्पातुन अहमदनगर महानगरपालिकेस कोणत्या पध्दतीने उत्पन्न मिळणार आहे. या बाबतची माहिती ( हे उत्पन्न प्रकल्पाच्या एकुण उत्पन्नाच्या किती प्रमाणात असेल किंवा जमिन भाडेपट्ट्याच्या स्वरुपात असेल )

उपरोक्त स्वरुपात संबधितांनी आपले सविस्तर प्रस्ताव अहमदनगर महानगरपालिकेस या जाहिर सुचनेच्या प्रसिध्दी दिनांका पासुन ६० दिवसाच्या आत सादर करावेत . आलेल्या प्रस्तावांचा तुलनात्मक अभ्यास करुन या प्रस्तावा बाबत मा. महासभेच्या मंजुरी नंतर पुढील निर्णय घेण्यात येईल.

विषयांकित तलाव व परिसराचे नकाशे व इतर माहिती अहमदनगर महानगरपालिकेच्या नगररचना विभागात कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

आयुक्त
अहमदनगरमहानगरपालिका

## NOTICE

EXPRESSION OF INTERST
AHMEDNAGAR MUNICIPAL CORPORATION, AHMEDNAGAR.
MAHARASHTRA

INVITES PROPOSALS FOR DEVELOPING STATE- OF -THE-ART AMUSEMENT PARK ON PUBLIC PRIVATE PARTNESHIP ( P.P.P.) BASIS IN THE VICINITY OF CITY.

PROJECT IN BRIEF

i) The prime intention of the project is to provide contemporary " **Amusement park** " for the entertainment of not only Ahmednagar city but for the pilgrims of Shirdi & Shani-Shingnapur aslo. It may further attract tourism in the whole state.

ii) THE LAND & ITS SURROUNDINGS

In the vicinity of the city towards north we have our own ' Pimpalgaon Lake ' which is situated about 7 k.m. away from the city . Actual lake comprises an area of 257 hectors and about 78 hectors open area which is in possession of A.M.C. on down stream side of dam including area under embankment of wall & road near dam.

As galloped by nature: surroundings of Pimpalgaon lake have natural beauty. More over there are number of holy places of worship near by the lake including MEHERAZAD of Avtar Meherbaba. The holy place of 'God Shani' i.e. villege Shani-Shingnapur is just 22 km away : while Shirdi the holy place of 'Shri Sai Baaba' is about 60 km.away .

At present amenity of developed " **Amusment park** " is not available in or near Ahmednagar city, and therefore there is every opportunity for this proposed Amusment Park to become famous whithin a very short time span & will fetch good amount of return if developed.

iii) Considering above facts: A.M.C. has decided to develop it on P.P.P. basis or in other manner vide resolution no. 4 dated 27/12/2007

iv) Generally it is expected to develop it through private sector - participation basis i.e., BOOT ( Build: continue to own : operate & tranfer basis ) But different proposals stating some new ideas will also be considered.

While submmiting development proposals for the " **Amusement Park** " following document / plans are compulsory.

1. Previous experience if any regarding development of such project.

2. Details of proposed development ( along with plans )

3. Finance Planning stating actual expenditure on project and way to recover it.

4. A.M.C. is providing **335** ha. of land for the project. In which way it will be remunerated . either through share in profit of the project or otherwise.

Considering above, all concerned should sent their detailed project report so as to reach this office whithin **60** days from the date of publication of this notice.

After scrutiny, received proposals will be submitted to General Board of A.M.C. for further sanction.Plans & relevant documents of the lake are available in the office of Assitant Director of Town Planning A.M.C. during office hours for inspection.

Ahmednagar.

Date:-

Commissioner
Ahmednagar Municipal Corporation.